# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी महासंघ बैठकीचे इतिवृत्त दि. १०/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | -- | -- | -- |
| २ | राज्यातील खाजगी अनुदानीत माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील प्रयोगशाळा सहाय्यक व ग्रंथपाल यांच्या ६ व्या वेतन आयोगातील वेतन निश्चिबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे कक्षाधिकारी मा.धुमाळ साहेब यांचे दि. २८/०८/२०१९ चे पत्र व मा. शिक्षण संचालक कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत. | राज्यातील खाजगी अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील प्रयोगशाळा सहाय्यक व ग्रंथपाल यांच्या ६ व्या वेतन आयोगातील वेतन निश्चिती करण्यात यावी अशी संघटनेकडून मागणी करण्यात आली.<br>तसेच प्रयोगशाळा सहाय्यक व ग्रंथपाल यांची कोल्हापूर जिल्हा वगळता बाकी सर्व जिल्ह्यांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती झाली असल्याबाबत सांगितले.<br>लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक, कोल्हापूर यांनी याबाबत शिबिराचे आयोजन करुन योग्य ती कार्यवाही करावी. | लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक, कोल्हापूर | -- |
| ३ | मा. शिक्षण संचालक कार्यालयाचे दि. ६ मे २०१९ च्या पत्रानुसार माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील प्रयोगशाळा सहाय्यकांची ७ व्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती होणेबाबत. | सर्व लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक यांनी याबाबत शिक्षण संचालनालयाच्या दि. ६ मे २०१९ च्या पत्रानुसार योग्य ती कार्यवाही करावी. | लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक | -- |
| ४ | कोल्हापूर जिल्ह्यातील खाजगी अनुदानतीत माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील कालबध्दची वेतन श्रेणी घेतलेल्या प्र.शाळा सहाय्यकांना ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीपासून का वंचित ठेवण्यात आले आहे. | ७ व्या वेतन आयोगानुसा देण्यात येणाऱ्या वेतनसंरचनेमध्ये प्रयोग शाळा सहाय्यकांच्या वेतन संरचनेबाबत (मॅट्रीक्स पध्दत) मध्ये स्पष्टता नसल्यामुळे कार्यवाहीस विलंब लागत आहे. | लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक | -- |
| ५ | कोल्हापूर अधीक्षक कार्यालयाकडून माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळामधील प्रयोगशाळा सहाय्यक यांची ७ व्या वेतन आयोगानुसारची पगार पत्रके का नाकारली जातात याची माहिती मिळावी. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना प्रयोगशाळा सहाय्यकांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन दयके स्विकारण्याबाबत सूचना द्याव्यात. | अधीक्षक, वेतन पथक | -- |
| ६ | कोल्हापूर विभागातील लेखाधिकारी कार्यालयात वेतन निश्चिती संदर्भात समन्वय नसलेबाबत. | याबाबत विभागातील सर्व लेखाधिकारी यांची बैठक लवकरच आयोजित करण्यात येणार असून बैठकीमध्ये लेखाधिकारी यांच्याकडील प्रलंबित विषयांचा आढावा घेवून योग्य त्या सूचना देण्यात येणार आहेत. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| ७ | कोल्हापूर विभागातील सर्व जिल्हा मा. लेखाधिकारी | कार्यबळ गटाची बैठक आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतील. | शिक्षण उपसंचालक | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | यांची कार्यबळ गटाची बैठक घ्यावी व आमच्या संघटनेस वेतन निश्चिती व अन्य विषयांबाबत बाजू मांडण्यासाठी बोलवावे. | | स्तरावर | |
| ८ | माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची सन २०१८-१९ संचमान्यतेनुसार किती प्रयोगशाळा सहाय्यक पदे अतिरिक्त झाली व किती पदे मंजूर झाली याची जिल्हानिहाय व शाळानिहाय यादी मिळणेबाबत. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची सन २०१८-१९ च्या संचमान्यतेनुसार प्रयोगशाळा सहाय्यकांच्या रिक्त पदांची जिल्हानिहाय माहिती तसेच शाळांची यादी उपलब्ध करुन द्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ९ | शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या सुधारित शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा आकृतीबंध लागू केला असून इ. ९ वी व १० वी दोन्ही वर्गात मिळून विद्यार्थी संख्या २०१ असेल तर प्र.शाळा सहाय्यक मंजूर असेल असे सूचित केले आहे. यामुळे ९० टक्के प्र.शा.सहा अतिरिक्त ठरणार आहेत यांच्या समावेशनाबाबत माहिती मिळणेबाबत. | याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल. | संचालनालय स्र्तरावर | -- |
| १० | अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील रिक्त झालेल्या प्र.शाळा सहाय्यक पदी प्र.शाळा परिचरांना पदोन्नती मिळणेबाबत माहिती मिळावी. | शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे. | शासन स्तरावर | -- |
| ११ | नांद्रे, विद्यालय, नांद्रे ता. मिरज, जि. सांगली येथील श्री.गिरी पी.के.प्र.शाळा सहाय्यक पदी बढतीस मान्यता मिळणेबाबत. मा. शिक्षणाधिकारी जि.प.सांगली यांना दि.०३/०९/२०१९ चा फेर प्रस्ताव बाबत निर्णय मिळणेबाबत. | शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे. | शासर स्तरावर | -- |
| १२ | सांगली जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना २०११-१२ पासून पी.एफ.स्लिपा मिळालेल्या नाहीत. याबाबत संबंधीत कार्यालयास योग्य सूचना देणेबाबत. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. सांगली यांनी अधीक्षक, वेतन पथक, सांगली यांचेकडे प्रलंबित असलेल्या पी.एफ.स्लिपाबाबत आढावा घेवून स्लिपा वितरणाबाबत तातडीने कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी (माध्य.) /वेतन पथक स्तरावर | -- |
| १३ | प्रत्येक जिल्ह्यातील मा. शिक्षणाधिकारी कार्यालयात नियमित तिमाही सहविचार सभा घेतल्या जात नाहीत. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी नियमितपणे जिल्हास्तरावर त्रैमासिक सभांचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी (माध्य.) स्तरावर | -- |
| १४ | पत्रव्यवहाराची दखल घेवून उलट टपाली खुलासा करण्याची सर्व कार्यालयास सूचना देणे. | आपल्या कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारांची संबंधीतांना उलट टपाली उत्तरे मिळतील यांची सर्व कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी. | सर्व दुय्यम कार्यालये | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | **मा. उपसंचालक साहेबांच्या अनुमतीने सभेतील आयत्यावेळचे प्रश्नावर चर्चा करणे.** | | | |
| ➢ | जिल्हा स्तरावर होणाऱ्या त्रैमासिक बैठकांचे उपस्थितीपत्रक मिळणेबाबत | जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या संघटना बैठकीमध्ये उपस्थित असणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांना उपस्थिती पत्रक देण्यात यावेत. | शिक्षणाधिकारी (माध्य.) स्तरावर | -- |
| ➢ | कोलबध्द पदोन्नतीबाबत | गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या कालबध्द पदोन्नतीपासून वंचित राहतात.<br>शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय अवलोकनी घेवून कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ➢ | प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर यांना मिळणाऱ्या नैमित्ती रजेबाबत | प्रयोगशाळा सहाय्यकांना दरवर्षी मिळणारी नैमित्तीक रजांची संख्या ही ८ आहे. ती ८ ऐवजी १२ करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.<br>याबाबत शासन निर्णय दि.१९.०५.२००४ अन्वये शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून राज्यातील मान्यताप्राप्त अशासकीय प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये, सैनिकी शाळा व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व अर्जीत रजा देय नसलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षात ८ ऐवजी १२ नैमित्तिक रजा अनुज्ञेय करण्यात आल्या आहे. | | |
| ➢ | **सर्वसाधारण सूचना :-** | | | |
| | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येतील. | संघटना स्तरावर | -- |

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर